# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०९/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. जलालखेडा** – अंतर्गत १० कि.मी अंतरावरील खापा शिवारात डांबर मिक्सर प्लान्ट येथे दिनांक २५/०९/२२ चे ०१.३० वा. ते ०२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रमोद रामकृष्णा पावडे वय ४५ वर्ष, रा. जामगाव बु. ता. नरखेड जि.नागपुर यांचे खापा शिवारात डांबर मिक्सर प्लान्ट आहे. सध्या पावसाळा सरु असल्याने डांबर प्लान्ट बंद आहे. त्यामुळे तेथील सामान उघडयावर असल्याने तेथे एक चौकीदार ग्यानु जग्गु मुरोलीया, वय ५८ वर्ष, रा. घोगरा याला मगील २० दिवसांपासुन ४,०००/–रु. महीन्याने चौकीदाराचे कामावर सामानावर लक्ष ठेवण्याकरीता ठेवलेला आहे. दि. २५/०९/२२ रोजी सकाळी ०५.३० वा. सुमारास मोरेश्वर फुसे रा. घोगरा याने फिर्यादीला फोनवर माहीती दिली की, रात्री ०१.३० ते ०२.०० सुमारास खापा शिवारात डांबर मिक्सर प्लान्ट येथे सामानाची चोरी झाली आहे. या माहिती वरून फिर्यादीने मौजा खापा शिवारात डांबर मिक्सर प्लान्ट येथे फिर्यादीने जावुन पाहीले असता ०१) डी.सी. मोटार १० नग कि. १००,०००/–रु., ०२) १ नग ब्लोअर कि. ७,०००/–रु., ०३) १०० लोखंडी ॲगल तार कपाउड १५,०००/–रु., ४) ट्रसल ६० नग लोखंडी ९०,०००/–रु., ५) चॅनल ९० नग २० फुट लांब १०,०००/–रु., ०६) ३५ नग गडर मोठे प्रत्येकी वजन २० किलो कि. १००,०००/–रु., ०७) एल.डी.ओ पंप २ नग ६,०००/–रु., ०८) ५०० फुट केबल मोठे बंडल ५,०००/–रु., ०९) बॅटीरी मोठी २ नग १०,०००/–रु., १०) मशीनचे पुर्ण बेरींग ८,०००/–रु., ११) गोटी पाना पेटी ५,०००/–रु., १२) पाण्याची ७,०० लिटर प्लॅस्टीक टंकी कि. २,०००/–रु. असा एकुण कि. ३,५८,०००/–रु. मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी मनोज चौधरी मो.नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

**१) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा उमरी शिवार येथे दिनांक २५/०९/२०१९ चे १३.४० वा. ते १४.३० वा. दरम्यान दोन लाल रंगाचे महिंद्रा कंपनीचे ५७५ ट्रॅक्टर क्र एमएच– ४०/ एल– ७७५१ व ट्रॉली क्र. एमएच– ४०/सीए– ७४९५ चे चालक मालक आरोपी नामे– ओमप्रकाश बाबुलाल मोरेशिया, वय ३४ वर्ष, रा. चौघान, २) लाल रंगाचे महिद्रा कंपनीचे ५७५ ट्रॅक्टर क्र एमएच– २७/एल– ८१०९ व विना क्रमांकाची ट्रॉली चा चालक आरोपी नामे– बशिर मतीन शेख वय ३० वर्ष रा. आझाद वार्ड रामटेक यांनी संगणमत करून मुसेवाडी येथील सुर नदीचे नाल्यातुन गौण खनिज रेती एकुण दोन्ही वाहनातील २ ब्रास एकुण कि ६,०००/–रू. ची अवैधरित्या विना परवाना वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांचे ताब्यातुन रेती व वाहनासह एकुण १०,०६,०००/–रु. मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि अतुल बांते पोस्टे रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि लांजेवार मो.न. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा साहोली येथे दिनांक २५/०९/२०१९चे १४.३० वा.ते १५.३० वा. दरम्यान अज्ञात tata hitachi ex २०० lc कंपनीचा पोकलेन मशीनच्या ऑपरेटर तसेच मालकानी कन्हान नदीच्या पात्रातुन अवैधरित्या पोकलेन मशीनच्या साहायाने रेती उत्खनन करून अंदाजे १०० ब्रास रेती किमती १,५०,०००/–रू ची चोरी केल्याने आढळुन आल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा नोद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे प्रशांत सांगाडे (तहसिलदार सावनेर), वय ४० वर्ष, तहसिल कार्यालय पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बासाडे मो.क्र. ९८२३०८३९०५ हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर